# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 01/03/2021 (सोमवार)

(सायंकाळ)

---

**कोंबडयांची झुंज लावून जुगार खेळविणाऱ्या अड्डयावर धाड**
**स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिणचे पथकाची कार्यवाही**

दि. 28/02/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, पो.स्टे. बोरी हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा कडुन त्यांना माहिती मिळाली की, मौजा नवरमारी गावाजवळील झुडपी जंगलातील यादवराव कुमरे यांच्या शेताजवळ गाडया उभ्या करून काही इसम हे कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळत आहेत. अशी माहीती मिळाताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने नवरमारी येथील यादवराव कुमरे यांच्या शेता जवळ जंगली झुडपाच्या ठिकाणी छापा घातला असता तेथे काही इसम मोठया प्रमाणावर कोंबडयाच्या झुंजीवर पैश्याची बाजी लावून जुगार खेळत असतांना दिसुन आले. घटनास्थळावरून आरोपी नामे 1) पुरुषोत्तम श्रीराम लोखंडे, वय 45 वर्ष, 2) किसन विठोबा भोयर, वय 52 वर्ष, 3) श्यामदेव लक्ष्मण फलझेले, वय 42 वर्ष, 4) सुरेश रामचंद्र मुल, वय 50 वर्ष, 5) पांडुरंग तुळशीराम लोखंडे, वय 46 वर्ष, 6) चंद्रपाल भाऊराव डंगोले, वय 41 वर्ष, 7) रविंद्र भाऊराव भुंगाते, वय 47 वर्ष, रा. वडद हे कोंबडयांच्या पायाला लोखंडी काती बांधलेले दोन कोंबडे खेळवितांना मिळून आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 2 जिवंत कोंबडे, नगदी व 6 मोटरसायकल असा एकुण कि. 2,68,075/—रू. चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार गजेंद्र चौधरी स्थानिक गुन्हे शाखा यांचे रिर्पोट वरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि जितेंद्र वैरागडे, पोउपनी. नरेंद्र गौरखेडे, सपोउपनि लक्ष्मीप्रसाद दुबे, पोहवा विनोद काळे, पोहवा संतोष पंढरे, पोहवा ज्ञानेश्वर राऊत, पोहवा रमेश भोयर, नापोशि अरविंद भगत, नापोशि शैलेश यादव, पोशि राधेश्याम कांबळे, पोशि प्रणय बनाफर, पोशि अमोल वाघ, पोशि अमृत किनगे, पोशि विरेंद्र नरड, पोशि अजित दुधकनोज, चानापोशि अमोल कुथे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर